# संस्थेची ध्येयं आणि उद्दिष्ट्ये

ज्ञातीतील दानशूर व्यक्तींनी संस्थेला दिलेल्या भरगोस निधीतून, त्यांनी व्यक्त केलेल्या इच्छेनुसार गौड ब्राह्मण सभेने विविध कायमनिधी फंड गठीत केले असून या कायमनिधी फंडांच्या रकमेच्या व्याजातून ज्ञातीतील निराधार, निराश्रित, गरीब, गरजू स्त्री/पुरुष, विद्यार्थी/विद्यार्थिनींना शिक्षणाकरिता शिष्यवृत्ती तसेच ज्ञातीतील विविध व्याधीग्रस्त रुग्णांना (कर्करोग, हृदयविकार, किडणीविकार, मतीमंद आदी व्याधीग्रस्त रुग्णांना) औषदोपचार/शस्त्रक्रियेसाठी आर्थिक मदत दिली जात आहे.

**संस्थेच्या विविध कायमनिधी फंडांचा तपशील खालीलप्रमाणे आहे–**

- **स्व. लक्ष्मीबाई बाळकृष्ण पाटील–निराश्रित महिला साहाय्यकारी कोष:**
  ज्ञातीतील निराधार, गरीब महिलांना आर्थिक साहाय्य, ज्ञातीतील गरजु, गरीब मुलींना शैक्षिणिक शिष्यवृत्ती.
- **स्व. लक्ष्मण अनंत पाटील पाटकर कुडाळदेशकर गौड ब्राह्मण महिला/पुरुष साहाय्यकारी कोष:**
  ज्ञातीतील निराधार गरीब महिला/पुरुषांना आर्थिक साहाय्य.
- **स्व. अन्नपूर्णा लक्ष्मण पाटील पाटकर कुडाळदेशकर गौड ब्राह्मण विद्यार्थी/विद्यार्थिनी विद्यावृद्धी कोष:**
  ज्ञातीतील गरजू, गरीब विद्यार्थी/विद्यार्थिनींना शैक्षणिक शिष्यवृत्ती
- **स्व. गौरी व स्व. मंगेश पाटील कु. दे. गौ. ब्रा. विद्यार्थी विद्यावृद्धी कोष:**
  शहराव्यतिरिक्त फक्त ग्रामीण भागातील ज्ञातीतील गरजू विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक शिष्यवृत्ती.
- **स्व. लीला व स्व. दामोदर सामंत कु. दे. गौ. ब्रा. विद्यार्थी विद्यावृद्धी कोष**
  शहराव्यतिरिक्त फक्त ग्रामीण भागातील ज्ञातीतील गरजू विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक शिष्यवृत्ती.
- **स्व. लक्ष्मीबाई बाळकृष्ण पाटील कु.दे. गौ.ब्रा. मतीमंद साहाय्य कोष:**
  ज्ञातीतील मतीमंदांना विशेषत: मतीमंद मुली व स्त्रियांना औषधोपचारासाठी आर्थिक साहाय्य.
- **स्व. लक्ष्मीबाई बाळकृष्ण पाटील कु.दे.गौ.ब्रा. रुग्णसेवा कोष:**
  ज्ञातीतील रुग्णांना विशेषत: स्त्री रुग्णांना औषधोपचारासाठी आर्थिक साहाय्य.
- **स्व. एकनाथ केशव ठाकूर कर्करोग वैद्यकीय उपचार फंड:**
  ज्ञातीतील निराधार, गरीब कर्करोगग्रस्त रुग्णांना वैद्यकीय उपचारांसाठी आर्थिक साहाय्य.
- **वैद्यकीय फंड :** ज्ञातीतील निराधार, निराश्रित, गरजू, गरीब व्यक्तींना आजारावर औषधोपचार करण्यासाठी आर्थिक साहाय्य.
- **वृद्धाश्रम फंड :** ज्ञातीतील निराधार, निराश्रित, गरीब, गरजू वयोवृद्धांना (७० वर्षावरील) वर्षातून जानेवारी/फेब्रुवारी महिन्यात) एकदा आर्थिक साहाय्य.
  मात्र यासाठी अशा व्यक्तींनी संस्थेकडे लेखी अर्ज (वय/उत्पन/आजार/आजारावर होणारा खर्च आदी माहितीसह) करावेत. अर्जदारांनी आपला दूरध्वनी/मोबाईल नं. लिहिणे.

- **कन्यादान फंड :** ज्ञातीतील गरीब, गरजु मुलींच्या विवाहासाठी आर्थिक साहाय्य.

ज्ञातीतील निराधार, निराश्रित, गरीब गरजू व्यक्तींनी आर्थिक मदतीसाठी रितसर लेखी अर्ज करावयाचे आहेत. संस्थेचे छापील अर्ज संस्थेच्या गिरगाव येथील कार्यालयात उपलब्ध आहेत. मुंबईसह अन्य बाहेरगावच्या तसेच ग्रामीण भागातील ज्ञातीबांधवांनी अर्जाची मागणी केल्यास आपल्याला टपालाने अर्ज पाठविला जाईल. मात्र त्यासाठी आपल्या लेखी अर्जात फंडाचा जरूर उल्लेख करावा. कन्यादान फंडासाठी लग्नपत्रिकार अर्जासोबत जोडवी. अर्धवट तपशील असलेल्या अर्जाचा संस्थेकडून विचार केला जाणार नाही.

वरील सर्व उद्धीष्ठाना आपण हातभार लावण्यासाठी सढळ हस्ते मदत करावी. कृपया चेक/डीडी ''गौड ब्राह्मण सभा''च्या नावे पाठवावा. सारस्वत बँक A/c No. 02200100027556 IFC Code SRCB 0000002 गिरगाव आणि अधिक माहीतीसाठी श्री. सुभाष वाघ (सेक्रेटरी)-९९२०७५२४६९ श्री. उमाकांत महाजन (कार्याध्यक्ष)-९६८९७८१७५० श्री.मनीष दाभोलकर (कोषाध्यक्ष)-९८२१२५८०४७

## संस्थेची अन्य सेवा दालने

- वधू-वर पालक मेळावा :

ज्ञातीतील वधू-वरांसाठी 'वधू-वर पालक मेळावा' आयोजित करून मान्यवरांच्या उपस्थितीत मार्गदर्शन केले जाते. ज्ञातीतील वधू -वरांची माहिती सभेच्या ''गौड ब्राह्मण'' त्रैमासिकात एकदाच प्रकाशीत केली जाते. वधू-वर नोंदणीसाठी वार्षिक शुल्क रु. २५१/- आकारले जाते. वधू-वर नोंदणी अर्ज संस्थेच्या कार्यालयात उपलब्ध आहेत. आपल्या विनंतीनुसार नोंदणी अर्ज टपालानेदेखील पाठविले जातात. संस्थेच्या आजीव सभासदत्वाची वर्गणी रु. १०००/- भरल्यास आजीवन संस्थेचे त्रैमासिक आपल्या पत्त्यावर विनामूल्य घरपोच पाठविले जाते. त्यासाठी आपण संस्थेचे आजीव सभासद होणे गरजेचे आहे. आजीव सभासदत्वाचे अर्ज कार्यालयात उपलब्ध आहेत. वधू-वरांनी आपली नावे संपूर्ण तपशीलासह संस्थेच्या कार्यालयात त्वरीत नोंदवावीत.

- **गौड ब्राह्मण सभा वार्षिक स्नेह संमेलन व पारितोषिक वितरण सोहळा :**

वार्षिक स्नेह-सम्मेलनाचे औचित्य साधून सामाजिक, शैक्षणीक, औद्योगिक, क्रीडा क्षेत्रांत कार्य करणाऱ्या ज्ञातीतील कर्तबगार, निपुण अशा व्यक्तींचा संस्थेतर्फे सत्कार, सन्मान केला जातो.

- **सामुदायिक मौजीबंधन सोहळा :**

संस्थेतर्फे नाममात्र नोंदणी शुल्क आकारून सामुदायिक मौजीबंधन सोहळा आयोजित केला जातो. संपूर्ण तपशीलासाठी कृपया सायं. ५.०० ते ८.०० या वेळेत कार्यालयात संपर्क साधावा.

- **रुग्णसेवा :**

ज्ञातीतील तसेच अन्य समाजातील रुग्ण व्यक्तींना वैद्यकीय उपचारासाठी परत देण्याच्या तत्वावर संस्थेतर्फे विनामूल्य वैद्यकीय उपकरणे पुरविली जातात. गरजूनी यांचा लाभ घ्यावा.

- **गौड ब्राह्मण त्रैमासिक विशेषांकांचे प्रकाशन :**

''गौड ब्राह्मण'' त्रैमासिक हे आपल्या ज्ञातीचे मुखपत्र आहे. या त्रैमासिकाला ७७ वर्षे पूर्ण झाली आहेत हे नमूद करायला आम्हाला विशेष आनंद होतो आहे. त्या त्रैमासिकाच्या माध्यमातून ज्ञातीमध्ये होणाऱ्या बदलाचा, तरुण

पिढीच्या नव्या विचार प्रणालीचा तसेच इतर घडामोडींचा परामर्ष घेतला जातो शिवाय ज्ञातीबांधवांना संघटित करून समाज प्रबोधनाचे कार्य केले जाते. गौड ब्राह्मण सभेतर्फे प्रकाशित केले जाणारे त्रैमासिक हे संस्थेचे परंपरेने चालत आलेले वैभव आहे.

संस्थेचे हे त्रैमासिक संस्थेच्या आजीव सभासदांना विनामूल्य घरपोच पाठविले जाते. त्यासाठी संस्थेचे आजीव सभासदत्व स्वीकारण्यासाठी ज्ञातीबांधवांना आम्ही विशेष आवाहन करीत आहोत. आजीव सभासदत्वाचे अर्ज संस्थेच्या कार्यालयात उपलब्ध आहेत. किंवा विनंतीनुसार अर्ज टपालाने पाठविले जातात.

आजीव सभासदत्वाची वर्गणी रु. १०००/- आहे.

- **शैक्षणिक पारितोषिक फंड :**

आपल्या ज्ञातीतील दानशूर व्यक्तींच्या नावाने संस्थेच्या विविध पारितोषिक फंडांच्या व्याजातून दरवर्षी माध्यमिक शालान्त (एस.एस.सी.) प्रमाणपत्र परीक्षा, उच्च माध्यमिक शालान्त (एच.एस.सी.) प्रमाणपत्र परीक्षा तसेच अन्य परीक्षांमध्ये विशेष गुणवत्ता संपादन केलेल्या ज्ञातीतील हुशार व होतकरू मुलां/मुलींना संस्थेतर्फे पारितोषिक व प्रशास्तीपत्रे देऊन गौरविण्यात येते.

ज्ञातीच्या ''गौड ब्राह्मण'' ह्या मुखपत्रातून शालांत व उच्च माध्यमिक परीक्षेत तसेच अन्य परीक्षेत गुणवत्ता प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचे ''गौड ब्राह्मण'' ह्या त्रैमासिकातून हार्दिक अभिनंदन केले जाते.